जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025
लोकसत्ता

## 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे'चे आज प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी लिहिलेल्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन पत्रकार डॉ. राधेश्याम जाधव यांच्या हस्ते उद्या शनिवारी सकाळी ११ वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. यावेळी डॉ. जाधव यांचे 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर व्याख्यान होणार आहेत. शाहूपूर्व आणि राजर्षी शाहू यांच्या काळात कोल्हापुरात कोणती वर्तमानपत्रे होती, त्यांनी कोणते विषय हाताळले होते, या अपरिचित विषयाची तपशीलवार मांडणी या पुस्तकात केली आहे. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची उपस्थिती आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025

सकाळ

# व्यवस्थापन परिषदेवर डॉ. मंजिरी मोरे बिनविरोध

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांची बिनविरोध निवड झाली. त्या सध्या विद्या परिषद, अधिसभा (सिनेट) या अधिकार मंडळांच्या सदस्यपदी कार्यरत आहेत.



**डॉ. मंजिरी मोरे-देसाई**

विद्यापीठातील जर्नालिझम विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे यांनी उमेदवारी अर्ज माघार घेतला. त्यामुळे डॉ. मोरे यांची बिनविरोध निवड झाली. या व्यवस्थापन परिषद अधिकार मंडळावर पुरुष गटातून निवडण्यात येणाऱ्या एका जागेसाठी निवडणूक लागली आहे. त्यात शिवाजी विकास आघाडीकडून विद्या परिषदेचे सदस्य आणि रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. एस. पी. हंगेरगीकर, तर शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाकडून (सुटा) पाटण महाविद्यालयातील प्रा. आर. के. निमट यांच्यात लढत होत आहे. विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागातर्फे निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे आहेत.




“ व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळावर बिनविरोध निवड झाल्याचा खूप आनंद वाटत आहे. याठिकाणी काम करण्याची संधी देणाऱ्या विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील आणि सदस्या डॉ. मुडे यांचे धन्यवाद मानते. सिनेट, विद्या परिषदेवर केलेल्या गुणवत्तापूर्ण कामाची पोचपावती या निवडीतून मिळाली आहे. आता विद्यापीठाच्या तिन्ही अधिकार मंडळांवर विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावीपणे पाठपुरावा करता येईल.

**-प्रा. डॉ. मंजिरी मोरे**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर डॉ. मंजिरी मोरे यांची निवड




- पुरुष गटात डॉ. एस. पी. हंगेरगीकर, प्रा. आर. के. निमट यांच्यात होणार लढत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर दोन जागांसाठी शुक्रवारी दोघांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे विद्या परिषदेच्या सदस्या डॉ. मंजिरी देसाई–मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. तर पुरुष गटातील एका जागेसाठी विद्यापीठ विकास आघाडीचे डॉ. एस. पी. हंगेरगीकर व 'सुटा"चे. प्रा. आर. के. निमट यांच्यामध्ये थेट लढत होणार आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागातर्फे व्यवस्थापन परिषद दोन जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया राबविली जात आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे काम पाहत आहेत. व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागा रिक्त झाल्या होत्या. विद्या परिषद सदस्यातून या दोन जागा निवडण्यात येणार आहेत. महिला गटातून डॉ. मंजिरी मोरे व डॉ. निशा मुडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

पुरुष गटातील एका जागेसाठी विद्यापीठ विकास आघाडीकडून प्रा. हंगेरगीकर, भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेजचे डॉ. मनिष भाटिया यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. 'सुटा"कडून प्रा. निमट व डॉ. सुनील चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. अर्ज छाननी प्रक्रियेत प्रा. भाटिया यांचा अर्ज अवैध ठरला आहे. उमेदवारी अर्ज माघारीच्या दिवशी 'सुटा'च्या प्रा. चव्हाण व जर्नालिझम विभागातील डॉ. निशा मुडे यांनी उमेदवारी अर्ज माघार घेतला आहे. त्यामुळे पुरुष गटातील एका जागेसाठी विकास आघाडीचे प्रा. हंगेरगीकर व 'सुटा"चे. प्रा. निमट यांच्यामध्ये निवडणूक होणार आहे. दि. ११ एप्रिल रोजी विद्या परिषदेची बैठक ही निवडणूक होत असून त्या बैठकीत अधिकृत घोषणा होणार आहे..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025
लोकमत

# विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर डॉ. मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर दोन जागांसाठी शुक्रवारी दोघांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे विद्या परिषदेच्या सदस्या प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. तर पुरुष गटातील एका जागेसाठी विद्यापीठ विकास आघाडीचे डॉ. एस. पी. हंगेरगीकर व 'सुटा'चे. प्रा. आर. के. निमट यांच्यामध्ये थेट लढत होणार आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या दोन जागा रिक्त झाल्या होत्या. विद्या परिषद सदस्यातून या दोन जागा निवडण्यात येणार आहेत. महिला गटातून प्रा. डॉ. मंजिरी मोरे व प्रा. डॉ. निशा मुडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. पुरुष गटातील एका जागेसाठी विद्यापीठ विकास आघाडीकडून प्रा. हंगेरगीकर, भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेजचे प्रा. डॉ. मनिष भाटिया यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. 'सुटा'कडून प्रा. निमट व प्रा. डॉ. सुनील चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. छाननीत प्रा. भाटिया यांचा अर्ज अवैध ठरला आहे. माघारीच्या दिवशी प्रा. चव्हाण व प्रा. डॉ. निशा मुडे यांनी उमेदवारी अर्ज माघार घेतला आहे. त्यामुळे पुरुष गटातील एका जागेसाठी विकास आघाडीचे प्रा. हंगेरगीकर व 'सुटा'चे. प्रा. निमट यांच्यामध्ये निवडणूक होईल. ११ एप्रिल रोजी विद्या परिषद बैठकीत अधिकृत घोषणा होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025

लोकमत

# तणावमुक्तीसाठी खेळा, लिहा, वाचा, बोला

## उर्मिला शुभंकर : हिंदी विभागात कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आजची युवा पिढी सोशल मीडियाच्या विळख्यात सापडली आहे. यातून या पिढीला बाहेर पडायचे असेल तर मोबाइलचा वापर कमी करत मित्रमंडळी व परिवाराशी संवाद वाढवला पाहिजे. तसेच वाचन, लेखन, मैदानी खेळ याकडे अधिक भर देण्याची नितांत गरज आहे. हाच तणावमुक्तीचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील समुपदेशक उर्मिला शुभंकर यांनी केले.

विद्यापीठातील हिंदी विभागाच्या वतीने शुक्रवारी 'नाती, भावना आणि करिअरचे संतुलन : हाच यशाचा महामार्ग' या विषयावर आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांकडून 'स्मार्टफोन व्यसनमापन चाचणी' व 'भावनिक परिपक्वता मापन चाचणी' सोडवून घेतली. शुभंकर यांनी करिअरच्या नव्या वाटा शोधताना नात्यांचा समतोल राखणे, भावनिक क्षमता वाढवणे गरजेचे असल्याचे सांगितले.

हिंदी विभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना परस्पर सहकार्याचे कौशल्य वाढविणे व पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन केले.

हर्षवर्धन रजपूत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संतोष कोळेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. प्रकाश मुंज, प्रा. अनिल मकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे यांच्यासह हिन्दी व इंग्रजी विभागाचे विद्यार्थी, संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 APR 2025
पुढारी

# विद्यापीठात 'तणावमुक्ती'वर कार्यशाळा

**कोल्हापूर :** आजची युवा पिढी सोशल मीडियाच्या विळख्यात सापडली आहे. यातून नव्या पिढीने बाहेर पडायचे असेल, तर मोबाईलचा वापर कमी करत मित्रमंडळी व परिवाराशी संवाद वाढवला पाहिजे. वाचन, लेखन, मैदानी खेळ याकडे अधिक भर देण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील समुपदेशक ऊर्मिला शुभंकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या वतीने 'नाती, भावना आणि करिअरचे संतुलन : हाच यशाचा महामार्ग' या विषयावर आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांकडून 'स्मार्टफोन व्यसनमापन चाचणी' व 'भावनिक परिपक्वता मापन चाचणी' सोडवून घेण्यात आली. शुभंकर यांनी करिअरच्या नव्या वाटा शोधताना नात्यांचा समतोल राखणे, भावनिक क्षमता वाढवणे गरजेचे असल्याचे सांगितले.

हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. हर्षवर्धन रजपूत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संतोष कोळेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सी. ए. लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. प्रकाश मुंज, प्रा. अनिल मकर, डॉ. अक्षय भोसले, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे आदी उपस्थित होते.